# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः26.02.2025** **वारःबुधवार**

---

- **महाराष्ट्र राज्य डेटा धोरणाच्या मसुद्याला राज्य मंत्रीमंडळाची मंजुरी,**
- **परळी आणि बारामतीमध्ये नवीन पशुवैद्यक महाविद्यालय स्थापन करण्यासाठीही मान्यता,**
- **राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ३ टक्क्यांनी वाढ,**
- **राज्य सरकारचा पहिला छत्रपती संभाजी महाराज महाराष्ट्र प्रेरणा गीत पुरस्कार स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या, 'अनादि मी, अनंत मी' या गीताला जाहीर**
- **आणि**
- **क्रिप्टोकरन्सी घोटाळ्याप्रकरणी पुण्यासह देशभरात ६०हून अधिक ठिकाणी सीबीआयचे छापे.**

**<u>मंत्रीमंडळ</u>**

**महाराष्ट्र राज्य आधारसामग्री डेटा धोरण आणि या धोरणाच्या मसुद्याला काल झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. शासनाच्या विविध विभागांकडे संकलित होणाऱ्या माहितीचा म्हणजेच आधारसामग्री – डेटाचा; गतिमान कामकाज तसंच; योजना, प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी वापर करून घेण्याच्या दृष्टीनं - हे धोरण तयार करण्यात आलं आहे. त्यासाठी महाराष्ट्र इस्टिटयूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन अर्थात मित्रा या संस्थेतंर्गत राज्य विदा प्राधिकरण स्थापन करण्यात येणार आहे.**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या मंत्रीमंडळ बैठकीत अन्य काही महत्वाचे निर्णयही घेण्यात आले.**

राज्याच्या विविध जिल्ह्यातील १९७६पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पांमुळे पुनर्वसन झालेल्या ३३२ गावठाणांमध्ये अपूर्ण राहिलेल्या नागरी सुविधा पुरवण्यासाठी कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी ५९९ कोटी ७५ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात येणार आहे.

याशिवाय परळी आणि बारामती इथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालयांच्या स्थापनेकरता मंत्रिमंडळानं मंजुरी दिली. या दोन्ही महाविद्यालयांसाठी प्रत्येकी ६७१ कोटी ७७ लाख ९३ हजार रुपये खर्चाच्या तरतुदीसही मंजुरी देण्यात आली.

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यातल्या पौड इथे लिंक कोर्टऐवजी कनिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय आणि प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालयाची स्थापना करण्यालाही या बैठकीत मान्यता देण्यात आली.

<u>आदिवासी विकास मुख्यमंत्री</u>

आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण, आरोग्य सेवा जलदगतीनं उपलब्ध होणं आवश्यक आहे; असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. आदिवासी विकास विभाग आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाद्वारे काल मुंबईत आयोजित परिषदेत मुख्यमंत्री बोलत होते. राज्यभरातील समतोल विकासासाठी सामाजिक उत्तरदायित्व अर्थात सीएसआर निधी खर्च व्हायला हवा; त्यासाठी राज्य सरकार सकारात्मक पावलं उचलणार असल्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामार्फत अनेक योजना राबविल्या जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

<u>महागाईभत्ता</u>

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ३ टक्के वाढ झाली असून  आता राज्य सरकारी सेवेतल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना ५३ टक्के महागाई भत्ता मिळेल. १ जुलैपासून ही दरवाढ लागू होणार आहे.  जुलै ते जानेवारी दरम्यानची थकबाकी या महिन्यातल्या वेतनासह दिली जाणार आहे.

<u>महाराष्ट्रअव्वल</u>

**प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र देशात अव्वल ठरला आहे. राज्यात २२ हजार १० प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग असून छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक १ हजार ८९५ प्रकल्प मंजूर आहेत. देशात २२ हजारचा टप्पा पार करणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य ठरलं आहे. शेतकरी तसंच सर्वसामान्यांचं आर्थिक जीवनमान उंचावण्यासाठी कृषि आणि अन्न प्रक्रिया हा उत्तम पर्याय असून ग्रामीण आणि शहरी भागातील लाभार्थी या योजनेत उत्स्फूर्तपणे सहभागी होत असल्याची माहिती कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली.**

**<u>प्रेरणागीत</u>**

**राज्य सरकारतर्फे यावर्षी पासून प्रेरणादायी गीताला छत्रपती संभाजी महाराज महाराष्ट्र प्रेरणा गीत पुरस्कार देण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी केली आहे. पहिला प्रेरणा गीताचा पुरस्कार स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या 'अनादि मी, अनंत मी' या गीताला देत असल्याचंही शेलार यांनी काल जाहीर केलं. फ्रान्सच्या दौऱ्यावर असलेल्या शेलार यांनी काल मार्सेलिस बंदर इथे झालेल्या बैठकीत ही घोषणा केली. दोन लाख रुपये आणि स्मृतिचिन्ह असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.**

**स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा आज आत्मार्पण दिन आहे; त्या पूर्वसंध्येला स्वातंत्र्यवीरांच्या गीताला हा पुरस्कार जाहीर होत असल्याचं समाधान आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.**

**<u>नियुक्ती</u>**

**राज्यातील ६० अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना पदोन्नती देऊन त्यांची तातडीनं पदस्थापना करण्याचा निर्णय राज्य शासनानं घेतला आहे. काल याबाबतचा आदेश जारी करण्यात आला. या अधिकाऱ्यापैकी २९ अधिकाऱ्यांना जिल्हास्तरीय जात पडताळणी समितीचे अध्यक्ष म्हणून पदस्थापना दिली आहे. जात पडताळणी समिती अध्यक्षांची ही २९ पदं काही वर्षापासून रिक्त होती.**

**<u>कुंभमेळा</u>**

**उत्तरप्रदेशात प्रयागराज इथे सुरु असलेल्या महाकुंभ पर्वाची आज महाशिवरात्रीला सांगता होत आहे. गेले ४५ दिवस सुरू असलेल्या या महापर्वात ६४ कोटींहून अधिक भाविकांनी पवित्र स्नान केलं. अमृतस्नान करण्याचा आज शेवटचा दिवस असल्याने गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनानं चोख व्यवस्था केली आहे.**

**<u>महाशिवरात्री</u>**

दरम्यान, महाशिवरात्रीनिमित्त आज राज्यातील ठीकठिकाणच्या शिव मंदिरांमध्ये भाविकांनी पहाटेपासूनच गर्दी केली आहे. भीमाशंकर, घृष्णेश्वर, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ आणि त्र्यंबकेश्वर या राज्यातल्या ज्योतिर्लिंगांच्या मंदिरांमध्ये दर्शनासाठी पहाटेपासूनच भाविकांच्या रांगा आहेत. विविध शिवमंदिरांमध्ये धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येत असून मंदिरांना आकर्षक विद्युत रोषणाई आणि फुलांची सजावट करण्यात आली आहे. 'विदर्भाची काशी' अशी ओळख असलेल्या गडचिरोली इथल्या चामोर्शी तालुक्यातील मार्कंडेश्वराच्या मंदिरात महाशिवरात्रीनिमित्त यात्रा भरवण्यात येते. या ठिकाणी महाराष्ट्राच्या विविध भागांसह शेजारच्या छत्तीसगड, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तेलगंणा इत्यादी राज्यांमधून लाखो भाविक येतात.

पुण्यातही ओंकारेश्वर, पांचाळेश्वर, नर्मदेश्वर, सोमेश्वर इत्यादी मंदिरांमध्ये पहाटेपासून प्रसन्न वातावरणात आणि भाविकांच्या गर्दीत पूजा, अभिषेक आणि मंत्रपठण सुरू आहे.

**<u>बिटकॉईनधाडी</u>**

क्रिप्टोकरन्सी गैरव्यवहारप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआयनं देशभरातल्या ६०हून अधिक ठिकाणी काल छापे टाकले. यात पुणे, कोल्हापूर, नांदेड, दिल्ली, चंदिगड, बेंगळुरू शहरांचा समावेश आहे. गेन बिटकॉईन नावाच्या २०१५मध्ये सुरू झालेल्या कंपनीने १८ महिन्यांसाठी दरमहा १० टक्के दराने फायदेशीर परतावा देण्याचं आश्वासन दिलं होतं. २०१७ मध्ये या कंपनीचा घोटाळा उघड झाला होता. त्यानंतर या कंपनीविरोधात देशभरात तक्रारी दाखल झाल्या होत्या.

**<u>आयएटी</u>**

भारतीय अवकाश विभागाचे माजी सचिव आणि अंतराळ आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. के. सिवन यांना पुण्यातल्या एआयटी संस्थेच्या ३१ व्या स्थापना दिनानानिमित्त काल झालेल्या कार्यक्रमात जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. डॉ. सिवन हे आंतरराष्ट्रीय ॲस्ट्रोनॉटिक्स अकादमी अर्थात IAA चे उपाध्यक्ष आहेत. त्यांनी ॲस्ट्रोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडिया अर्थात ASI चे अध्यक्ष म्हणूनही काम केलं असून . त्यांच्याच अध्यक्षतेखाली इस्रोनं २२ जुलै २०१९ रोजी चंद्रावरील चांद्रयान-२ मोहीम आखली होती.

**<u>फळ</u>**

सांगली जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या दर्जेदार फळांना, फळ महोत्सवाच्या माध्यमातून थेट बाजारपेठ उपलब्ध झाली असून जिल्ह्यात पुढील वर्षी फळ महोत्सवाला व्यापक स्वरूप देऊ", अशी ग्वाही सांगली जिल्हा

परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे यांनी दिली. द्राक्षदिनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित केलेल्या 'फळ महोत्सवाचं उद्घाटन धोडमिसे आणि सांगली, महानगरपालिकेचे आयुक्त शुभम गुप्ता यांच्या हस्ते काल झालं. त्यावेळी त्या बोलत होत्या.

<u>**रणजी**</u>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेचा अंतिम सामना, आज विदर्भ आणि केरळ संघांमध्ये होणार आहे. नागपूरच्या विदर्भ क्रिकेट असोसिएशन स्टेडिममधे आज सकाळी साडेनऊ वाजता हा सामना सुरु होईल. या स्पर्धेत विदर्भानं सातपैकी ६ सामने जिंकून ४० गुणांची कमाई केली. तर केरळनं सातपैकी ३ सामने जिंकून २८ गुण कमावले आहेत.

<u>**क्रिकेट**</u>

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेतला कालचा दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया संघादरम्यानचा सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. त्यामुळे आता दोन्ही संघांचे गुण 1-1 असे बरोबरीचे झाले आहेत.

<u>**हवामान**</u>

राज्यात आगामी दोन दिवस मुंबईसह कोकणातल्या सर्व जिल्ह्यांमधे उष्णतेची लाट येण्याचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे. या काळात तापमान ३७ ते ३८ अंश सेल्सिअस पर्यंत राहण्याची शक्यता आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.**